१.३३ संदर्भ व टीपा

१. जाधव रा. ग.: निळीपहाट श्रीविद्या प्रकाशन, २५० शनिवार पेठ, पुणे ३०,

२. मेश्राम डॉ. योगेंद्र : दलित साहित्य उद्‌गम आणि विकास श्री मंगेश प्रकाशन, नागपूर

३ नेरूरकर प. श्री. : मायमराठी दलित साहित्य विशेषांक, ऑगस्ट १९७५,

४ ढाणके डॉ. सुखदेव : बाबुराव बागूल व्यक्ती आणि वाङ्मय स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद

५ कुलकर्णी गो. म. व पुंडलीक डॉ. विद्याधर संपा : दलित साहित्य : एक सामाजिक, सांस्कृतिक अभ्यास सुगावा प्रकाशन, पुणे ३०,

६ मुलाटे डॉ. वासुदेव : दलित साहित्य : नवे आकलन मराठवाडा पब्लिशिंग हाऊस, औरंगाबाद

७ मनोहर डॉ. यशवंत : आंबेडकरवादी मराठी साहित्य भीमरत्न प्रकाशन, इंदोरा, नागपूर

८ कऱ्हाडे डॉ. सदा : दलित साहित्य एक चिकित्सा स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद ०३

९ लिंबाळे शरणकुमार संपा : मराठी वाङ्मयातील नवीन प्रवाह मधुराज प्रकाशन पुणे ३०,

१० वाघमारे योगीराज : सभापती साकेत प्रकाशन म. गांधी नगर, औरंगाबाद ०५,On 04/09/2021, Balasaheb Shelke <balasahebshelke1971@gmail.com> wrote:> ICICI Bank Acct XXX695 debited with INR 500.00 on 04-Sep-21. Acct XXX155> credited.UPI:124757744161.Call 18002662 for dispute or SMS BLOCK 695 to> 9215676766.

□□□

**03**

# १९८० नंतरची मराठी आदिवासी कादंबरी : एक दृष्टिक्षेप

**डॉ.पांडुरंग भोसले**
एस.एम.जोशी कॉलेज, हडपसर, पुणे

**डॉ.सचिन सि.रुपनर**
हडपसर, पुणे

**********

२० व्या शतकामध्ये मानवाने विज्ञानाची कास धरली आणि तो तंत्रज्ञानाच्या सहाय्याने आपली प्रगती करू लागला. या तंत्रज्ञानामुळे तो सर्वच क्षेत्रामध्ये प्रचंड अशा वेगाने धावू लागला. त्याला या तंत्राची—यंत्राची एवढी सवय लागली की, यंत्र बनवणारा माणूस स्वतःच यंत्र बनतो की काय ? असा प्रश्न निर्माण झाला. या बदलापासून साहित्य आणि साहित्यिक अलिप्त राहू शकले नाहित. संवेदनशील अशा लेखक साहित्यिकांनी हा बदल आपल्या लेखणीतून टिपला. या आधुनिकीकरणाला बळी पडणारा समाज जसा एकीकडे होता, तसाच या भौतिकतावादी सुखापासून, यांत्रिकीकरणापासून कोसो दूर असणारा, आपले परंपराधिष्टीत जीवन जगणारा, निसर्ग, डोंगर—दऱ्या, पहाडांमध्ये, जंगलात वास्तव्यास असणारा, निसर्गाच्या सान्निध्यात राहणारा व निसर्गालाच आपले दैवत मानणारा, त्याची पूजा करणारा, रूढी, परंपरा, संस्कृतीच्या आधिन राहून निसर्गाशी विज्ञाननिष्ठेची जोड देणारा असाही समाज आज अस्तित्वात आहे. तो समाज म्हणजे आदिवासी समाज होय. या समाजाची

सुख–दुःखे, श्रद्धा–अंधश्रध्दा, त्यांच्या समस्या, प्रश्न, व्यथा, वेदना, संघर्ष, त्यांची संस्कृती, रूढी, परंपरा, दैवते या सर्वांचा व पर्यायाने या आदिवासी समाजाच्या जीवनपद्धतीचा वेध घेण्याचा प्रयत्न काही संवेदनशील लेखकांनी केला. त्यातूनच मराठी साहित्यामध्ये अलीकडेच आदिवासी साहित्याचा प्रवाह नव्याने जोम धरू लागला. इतर प्रवाहांप्रमाणेच आदिवासी साहित्यामध्ये कादंबरी या साहित्यप्रकाराची संख्या विपुल प्रमाणात आहे. प्रस्तुत ठिकाणी या प्रवाहातील काही प्रमुख कादंबऱ्यांचा धांडोळा घ्यावयाचा प्रयत्न आहे.

**१९८० नंतरची आदिवासी कादंबरी** : आदिवासी साहित्याचा प्रवाह खऱ्या अर्थाने १९७५ नंतर बहरला व नावारूपाला आला. आदिवासींच्या जीवनावर प्रथम बिगर आदिवासी लेखकांनीच लेखन करण्यास प्रारंभ केला. म्हणून त्यांचे लेखन महत्त्वपूर्ण ठरते. या संदर्भात विनायक तुमराम म्हणतात,''गैरआदिवासी लेखकांनी आदिवासी जमातींवर लिहिलेल्या कादंबऱ्यांची संख्या अल्प असली तरी आदिवासींच्या जळत्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे कार्य या कादंबरीकारांनी केल्याचे आढळून येते.''[१] म्हणून प्रस्तुत ठिकाणी आदिवासी समाजाच्या जीवनजाणिवा व्यक्त करणाऱ्या कादंबऱ्यांचा विचार करताना आदिवासी कादंबरीकारांबरोबरच बिगर आदिवासी लेखकांच्या कादंबऱ्यांचाही विचार केला जाणार आहे. ''आदिवासी लेखकांनी लिहिलेल्या कादंबऱ्यापेक्षा बिगर आदिवासी लेखकांनी लिहिलेल्या कादंबऱ्यांची संख्या मोठी आहे. बिगर आदिवासी लेखकांनी लिहिलेल्या कादंबऱ्यांच्या लेखनामागे मानवी स्वभाव, कुतूहल जरी असली; तरी अनेक बिगर आदिवासी लेखकांनी आदिवासींवर होणाऱ्या अन्यायाला, त्यांच्या शोषणाला, पिळवणूकीला, लैंगिक शोषणाला, शेट–सावकारांकडून होणाऱ्या फसवणूकीला कादंबरी लेखनाद्वारे वाट करून दिली आहे.''[२] हा तुकाराम रोंगटे यांचा बिगर आदिवासी लेखकांनी लिहिलेल्या कादंबऱ्यासंदर्भातील अभिप्राय रास्तच वाटतो. १९८० नंतर खऱ्या अर्थाने आदिवासी कादंबरीचा प्रवाह मराठी साहित्यात स्थिरावू लागला. याच कालखंडात आदिवासी लेखक कादंबरी लेखनाकडे वळाले. या कादंबरीमध्ये आदिवासींच्या वेदना—विद्रोह, शोषण—पिळवणूक, व्यथा, फसवणूक, चिंतन इत्यादींचे प्रतिबिंब अतिशय वास्तवपणे पडल्याचे जाणवते. त्यापैकी काही प्रमुख कादंबऱ्या व कादंबरीकार पुढीलप्रमाणे —

**दादा देशकर** : दादा देशकर यांनी आदिवासी जीवनावर 'न्यायदंड' ही कादंबरी १९८२ मध्ये लिहिली ही कादंबरी एका सत्य घटनेवर आधारित आहे. स्वत: लेखक वकील असल्यामुळे आपला पेशा चालविताना, आदिवासींसाठी न्यायालयात लढत असताना त्यांना जे विविधांगी अनुभव आले त्या अनुभवातून, खटल्यांमधून ही कादंबरी लिहिली गेली आहे. या कादंबरीत प्रस्थापित समाजव्यवस्था व नोकरदार यांच्याकडून आदिवासी यांच्यावर होणारा अन्याय—अत्याचार व त्यातूनही न मिळणारा न्याय या सर्वांचे प्रभावी व वास्तववादी चित्रण लेखकाने केले आहे.

**अनिल सहस्त्रबुद्धे** : आदिवासी महादेव कोळी आणि ठाकर समाजाच्या बोली भाषेत लिहिलेल्या 'डांगाणी' या सामाजिक कादंबरीने डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे यांच्या कादंबरी लेखनास १९८५ मध्ये सुरुवात झाली. त्यानंतर १९८६ मध्ये त्यांनी 'अहिनकुल' ही कादंबरी लिहिली. त्यांच्या या दोन्ही कादंबऱ्या विशेष उल्लेखनीय आहेत.

सहस्त्रबुद्धे यांची 'डांगाणी' या कादंबरीतून अहमदनगर जिल्ह्यातील डांगण परिसरात वास्तव्यास असणाऱ्या महादेव कोळी व ठाकर या दोन समाजातील

लोकांचा जीवनसंघर्ष कथन केला आहे. प्रस्तुत कादंबरीतील नायक भागा व गावचा सरपंच बाळा रोंगटा यांच्यातील शत्रुत्व व त्यामुळे भागाच्या कुटुंबाची झालेली वाताहत यांचे चित्रण कादंबरीकाराने केले आहे. भागा हा अतिशय समजुतदार व सारासार विचार करून वर्तन करणारा असूनदेखील सरपंच बाळाच्या खुनशी स्वभावामुळे व त्याच्या ताकदीमुळे त्याचे सर्वच्या सर्व कुटुंब उध्वस्त होते. त्याच्या अज्ञानामुळे त्याला त्याच्या कुटुंबाचे होणारे शोषण थांबवता येत नाही. या कादंबरीद्वारे कादंबरीकाराने आदिवासी जीवनावर भाष्य केले आहे.

तर 'अहिनकुल' या ऐतिहासिक कादंबरीत पेशवाईच्या अस्तानंतर गोविंद खाडे, रामजी भांगरे व रामा किरवा या आदिवासी पुढाऱ्यांना १८२७ ते १८३५ मध्ये इंग्रजी सत्तेविरुद्ध कॅप्टन सीक्स व कॅप्टन मकिनटोश यांच्याशी भंडारदरा तलावाच्या जागेवर रत्नगडावरून केवळ एका तोफेच्या बळावर जो तुंबळ लढा दिला त्या लढ्याचा सविस्तर रोमांचक इतिहास वर्णिला आहे. तर आदिवासी समाजातील सुशिक्षित हुशार तरुण औद्योगिक क्षेत्रात प्रवेश करून प्रस्थापित होणाच्या प्रयत्न करू लागले तर कशा स्वरूपाचा सामाजिक, आर्थिक संघर्ष निर्माण होऊ शकतो या विषयावरील सामाजिक कादंबरी म्हणून त्यांच्याच 'वावटळ' या कादंबरीचा उल्लेख करावा लागेल.

**दिनानाथ मनोहर** : कादंबरीकार दिनानाथ मनोहर हे कम्युनिस्ट विचारांचे निष्ठावंत कार्यकर्ते असून आदिवासी समाजाच्या हक्कासाठी, न्यायासाठी ते स्वत: आंदोलनामध्ये सहभागी झाले होते. 'रोबो' ही त्यांची विशेष गाजलेली कादंबरी यानंतर त्यांनी आदिवासींवर आधारीत 'आंदोलन' ही कादंबरी १९८८ मध्ये लिहिली. त्यातून त्यांनी शहादा तालुक्यातील भिल्ल लोकांनी शोषण व्यवस्थेविरुद्ध केलेल्या आंदोलनाचे चित्रण केले आहे. शोषित, पीडित आदिवासींची कथा—व्यथा सांगणारी कादंबरी म्हणून या कादंबरीचा उल्लेख करावा लागेल. या कादंबरीचा नायक रघुनाथ हा आदिवासी नसणारा परंतु आदिवासी समाजाबद्दल आपुलकी असणारा, साम्यवादावर निष्ठा ठेवणारा आहे. तो आणि त्याचा मित्र अजित दोघे मिळून आदिवासींच्या हक्कासाठी, त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी एक यशस्वी आंदोलन उभे करतात व त्याद्वारे आदिवासींना न्याय मिळवून देतात.

दिनानाथ यांची आदिवासी जीवनावर आधारित 'मन्वंतर' ही दुसरी कादंबरी ऐतिहासिक घटनांवर आधारित आहे. या कादंबरीतून स्वातंत्र्यपूर्व काळातील कंपनी सरकारविरुद्ध आदिवासी समाज असा संघर्ष अवतरतो. त्याद्वारे लेखक आदिवासींचे स्वातंत्र्य लढ्यातील योगदान व त्यांनी दिलेल्या बलिदानाची दखल घेतात.

**शरद दळवी** : शरद दळवी यांची 'एकलव्य' ही कादंबरी म्हणजे पौराणिक संदर्भाचा मागोवा घेतघेत वर्ग—वर्णाच्या आंधळ्या श्रेष्ठत्वामुळे बळी गेलेल्या एकलव्याची चरित्रकहाणी होय. निषाद नायक हिरण्यधनूचा पुत्र एकलव्य याची द्रोणाचार्यांकडे शिष्य म्हणून स्वीकारण्याची मागणी, त्यास त्यांनी दिलेला नकार, त्यानंतर त्यांचा पुतळा बनवून स्वत:च्या कठोर साधनेच्या बळावर धनुर्विद्येमध्ये आत्मसात केलेली पारंगतता, अर्जुनाला 'जगदवीर' बनविण्यासाठी द्रोणाचार्यांनी गुरुदक्षिणा म्हणून एकलव्याचा मागितलेला व त्याने बहाल केलेला अंगठा आणि अखेरीस एकलव्याचा युद्धामध्ये प्रवेश व श्रीकृष्णाकडून आलेले मरण, असा हा कादंबरीचा कथाभाग आहे. या कादंबरीचा आशय पौराणिक स्वरूपाचा असला तरी त्याचे पौराणिक

संदर्भ वर्तमानाशी जोडण्याचा लेखकाचा प्रयत्न येथे दिसून येतो. हे या कादंबरीच्या मलपृष्ठावरील आशयातून जाणवते. ''आद्य एकलव्याच्या कापल्या अंगठ्यातून गळणाऱ्या रक्ताच्या कणाकणांतून कधी जात, कधी धर्म, कुठं रक्तशुद्धी, कुठं वर्ण अशा कोणत्या ना कोणत्या कारणाने रोज नवनवे एकलव्य जन्माला येता आहेत; आयुष्यातील छोट्या—मोठ्या संघर्षाला भिणारे, पोटासाठी लाचार झालेले द्रोणाचार्य पावलोपावली भेटत आहेत.''[३] आज समाजात जे ज्ञानाचे उपासक आहेत त्यातील काही लाचार, पोटार्थी, स्वार्थी, आत्मकेंद्री बनल्यामुळे समाजाची प्रचंड अशी नैतिक घसरण होत आहे याचे वास्तववादी यथार्थ चित्रण प्रस्तुत कादंबरीतून लेखकाने घडविले आहे.

**मधुकर वाकोडे** : मधुकर वाकोडे लिखित 'झेलझपाट' या कादंबरीत प्रामुख्याने केरू व फुलय या दोन आदिवासींची प्रेमकहाणी अवतरते. या कादंबरीतून कोरकू समाजातील सण, उत्सव, देवदेवता, दंतकथा, त्यांचे धनिकांकडून व व्यापाऱ्यांकडून होणारे शोषण तसेच तरुण—तरुणींमध्ये असणारे मुक्त स्वातंत्र्य याचे प्रतिबिंब पहावयास मिळते. स्वत:च्या जमिनीत मोलमजुरी करणाऱ्या, परक्यासारखे वास्तव्य करणाऱ्या, सरकारी अधिकारी, शेठ—सावकार, व्यापारी अशा सर्वांकडूनच सर्व स्तरावर फसविले जाणाऱ्या, शोषण होणाऱ्या आदिवासींचे जीवनदर्शन ही कादंबरी घडविते आणि वाचकांना अंतर्मुख करते. तमाम नीतिभ्रष्ट समाजव्यवस्थेचा फोलपणा या कादंबरीतून अनुभवण्यास मिळतो. तसेच केरू व फुलय यांच्या सुंदर, नि:स्वर्थी, निखळ, पवित्र पण विफल प्रेमाचा अखेर मनाला चटका लावून जातो.

**सुरेश द्वादशीवार** : सुरेश द्वादशीवार लिखित 'हाकुमी' या कादंबरीत माडिया या जमातीचे जीवन चित्रण आले आहे. या कादंबरीत माडिया समाजातील डॉ. कन्ना मडावी यांच्या संघर्षाची, कर्तृत्वाची आणि प्रेमाची कहाणी अवतरते. लोकशाहीच्या मार्गाचा अवलंब केल्यानेच माडिया समाजाचा विकास होईल यावर डॉ. कन्ना यांचा ठाम विश्वास आहे. म्हणूनच तो नक्षलवाद्यांचा बंदोबस्त करण्यासाठी माडिया लोकांमध्ये पोलिसांनी निर्माण केलेल्या दहशतीला तडा देऊन माडिया समाजात विरोध करण्याचे सामर्थ्य निर्माण करण्यात यशस्वी होतो. म्हणूनच तो आदिवासींच्या भवितव्याचा, सामाजिक सुधारणावादी, लोकशाहीचा मार्ग अवलंबणारा डॉ. कन्ना आदर्श म्हणून उभा रहातो. या कादंबरीच्या संदर्भात मधु जामकर लिहितात,—''जीवनाचे विशेषत: आदिवासी जीवनाचे गहिरे रंग दाखवीत ती वाचकास अंतर्मुख करते. ही अंतर्मुखता पीडितांबद्दल, उपेक्षितांबद्दल जातिवंत जिव्हाळा वाटल्यामुळे येतेकृकृ ज्या आदिवासी समाजाचा सर्वांगीण विकास अशक्य करून सोडलेला आहे, त्यांच्या जीवनातील मुलभूत समस्यांचे अत्यंत सहृदयतेने चित्रण करून वाचकांच्या मनात या समस्यांबद्दल सहानुभूती उत्पन्न होते.''[४]

'तांदळा' ही द्वादशीवार यांची दुसरी कादंबरी श्री विद्या प्रकाशन, पुणे यांनी १९८९ मध्ये प्रसिद्ध केली. एका तरुणीच्या तारुण्यसुलभ भावना कशा अतृप्त राहतात, हा या कादंबरीचा विषय आहे. या कादंबरीच्या नायिकेच्या अंगात 'तांदळा' नावाची देवी वास करते आणि त्यामुळे सारा गाव, समाज तिच्याकडे देवीचा अवतार म्हणून पाहू लागते. तिला देवत्त्व बहाल केल्यामुळे तिच्या तारुण्यसुलभ व शरीरसुखाची भावना अतृप्तच राहते अशी 'तांदळा' ही एक रहस्यमय कादंबरी आहे.

**कल्पना देसाई—गोसावी** : श्री विद्या प्रकाशन, पुणे यांनी कल्पना देसाई—गोसावी यांची 'आम्ही डिंका' ही

वनअधिकारी, शेठ—सावकार—जमीनदार कशाप्रकारे उचलतात व त्यांचे कसे प्रचंड शोषण करतात यावर प्रकाश टाकला आहे. एवढेच नव्हे तर त्यांच्याच समाजात असणारे काही धूर्त हुशार बांधव आपल्याच समाजातील बांधवांची कशाप्रकारे फसवणूक करतात हेही या कादंबरीतून अधोरेखित केले आहे. वेठबिगारीमुळे आदिवासींच्या जीवनाची कशाप्रकारे वाताहत होते यावर लेखकाने नेमकेपणाने बोट ठेवले आहे.

या वरील कादंबरीकारांशिवाय बाबा भांड (तंट्या), गोपाळ गवारी (कोळवाडा), शंकरराव खरात (पारधी), दिवाकर दाभाडे (बिलामत), रामचंद्र नलावडे (लाडी), इत्यादी इतरही काही लेखकांनी आदिवासी समाजाचे जीवनचित्रण करणाऱ्या कादंबऱ्या लिहिल्या आहेत. याही कादंबऱ्यांमधून आदिवासी समाजाची सुख—दु:खे, व्यथा—वेदना, शोषण—पिळवणूक, अन्याय—अत्याचार, सर्वच स्तरावर स्त्रियांची होणारी लुबाडणूक या सर्वांचे वास्तवादी चित्रण अवतरते.

अशाप्रकारे वरील कादंबऱ्यांतून आदिवासी समाजाचे जीवनदर्शन घडते. या सर्वच कादंबऱ्यांमधून आदिवासी माणूस आणि त्याचे जीवन, त्यांच्या श्रद्धा—अंधश्रध्दा, रूढी परंपरा, त्यांचे शोषण—पिळवणूक, त्यांच्यावर होणारे अन्याय—अत्याचार, त्यांचे सण—उत्सव, ते साजरे करण्याची पद्धत, त्यांची व्यसनाधिनता, अज्ञान व त्यातून येणारे दारिद्र्य, समाजातील स्त्रियांचे स्वातंत्र्य, अस्तित्व व त्यांची धनिकांकडून, सरकारी अधिकारी यांच्याकडून लुटली जाणारी आब्रु या सर्वांचे वास्तव चित्रण येते. म्हणून या आदिवासी माणसाविषयी व साहित्याविषयी डॉ. अक्षयकुमार काळे लिहितात, ''आदिवासी साहित्य हे सर्व पुरोगामी साहित्याहून वेगळे आहे. आदिवासी साहित्य हा स्वच्छ व निर्मळ प्रवाह आहे. त्यातील जाणीवा, संवेदना, भावना सर्वस्वी वेगळ्या आहेत.''[६] म्हणून इतर साहित्यप्रवाहांपेक्षा आदिवासी कादंबरीचा प्रवाह वेगळा ठरतो.

आदिवासी कादंबरीतून अवतरलेले अनुभवविश्व वास्तववादी असून आदिवसी लेखकांनी लिहिलेली कादंबरी ही स्वअनुभवातून अवतरली आहे. त्यातून आपल्या व्यथा—वेदना, आपल्या समाजाने केलेला संघर्ष, समाजातील व्यक्तींचे व पर्यायाने समाजाचे होणारे शोषण, त्यांची भूक, आक्रोश, विषमता इत्यादींना इतर समाजासमोर अभिव्यक्त करण्याच्या हेतूने ही साहित्यनिर्मिती झाली आहे. कोणत्याही घटकाचे दोन घटका मनोरंजन—करमणूक करणे, आपल्या समस्या, संकटे यापासून पलायन करणे, ठराविक समूहला वा एखाद्या व्यक्तीला बदनाम करणे या वा यापैकी कोणताही उद्धेश नजरेसमोर ठेवून हे साहित्यिक लेखन झालेले नाही हेच या साहित्याचे खरे व खास वैशिष्ट्य म्हणता येईल. आदिवासी साहित्याच्या या वेगळेपणाबद्दल डॉ. विनायक तुमराम लिहितात, ''आदिवासींच्या बंडखोरीला वनवासमुक्तीचा आशय आहे. आयडेंटिटीचा प्रश्न हा या बंडखोरीचं लक्ष्य आहे. ही बंडखोरी विध्वंसक नाही. अट्टाहासाची नाही तर नवनिर्मितीक्षम वास्तवदर्शी आहे.शतकामागून शतकाचा अन्याय, अत्याचाराविरुद्धचा छळ, शोषणाविरुद्ध ही बंडखोरी आहे. भारतीय आदिम समाजाची पुनर्घटना या बंडखोरीला अभिप्रेत आहे. आदिवासींना झालेले आत्मभान या बंडखोरीमागे तटस्थ आहे.''[७] या अशा वैशिष्ट्यांमुळेच आदिवासी साहित्यात विपुल प्रमाणात लेखन होताना दिसते. म्हणूनच हा प्रवाह अधिकाधिक समृद्ध होताना दिसतो.

**संदर्भ ग्रंथ :**

१. तुमराम, विनायक, ''आदिवासी साहित्य :

दिशा आणि दर्शन'', स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, २०१२,पृ.क्र. १३.

२. रोंगटे, तुकाराम, ''आदिवासी साहित्य : चिंतन आणि चिकित्सा'', दिलीपराज प्रकाशन, पुणे, २०१४,पृ.क्र.७४.

३. दळवी, शरद, ''एकलव्य'', मेहता पब्लिकेशन हाऊस, पुणे, पुनर्मुद्रण,२००८, मलपृष्ठ.

४. जामकर, मधु, ''संवाद—आस्वाद'', परम मित्र पब्लिकेशन, ठाणे,२०१०,पृ.क्र.६४.

५. देवी, महाश्वेता, ''अरण्येर अधिकार'', ऊर्जा प्रकाशन, पुणे,२०१०, पृ.क्र.२४.

६. काळे, अक्षयकुमार, ''तीरकमठा'', दै. महाविदर्भ, चंद्रपूर, दि.२९.११.१९९९, पृ.क्र.०४.

७. लिंबाळे, शरणकुमार (संपा.), ''मराठी वाङ्मयातील नवीन प्रवाह'', मधुराज पब्लिकेशन्स प्रा. लि. पुणे, १९९३, पृ.क्र.१५२.

□□□

**04**

# १९८० नंतरच्या स्त्रियांच्या कवितेचे समाजशास्त्रीय मूल्यमापन

**डॉ. हरेश संपत शेळके**
मराठी विभागप्रमुख,
न्यू आर्टस् कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेज, पारनेर

**********

१९८० नंतर साहित्य कलांच्या क्षेत्रात नवी निर्मिती होत होती त्याचप्रमाणे नव्या चळवळींचाही उदय होत होता. काही चळवळी उदयालाही आल्या होत्या. दलित, आंबेडकरी, ख्रिस्ती, मुस्लीम, आदिवासी, ग्रामीण, विद्रोही, समरसता, सत्यशोधक, समता अशी साहित्य संमेलनेही भरू लागली. १९७० पासून ग्रामीण जीवनातले प्रश्नही उग्र होत गेले. शेतीची आणि शेतकऱ्यांची स्थिती दारूण होत गेली. या संपूर्ण कालखंडात संबंध देशात आत्यंतिक अस्वस्थता, प्रक्षोभ, अशांतता निर्माण झालेली दिसून येते. हे सर्व एकीकडे घडत असतानाच संयुक्त राष्ट्रांनी (युनोने) १९७५ ते १९८५ हे स्त्रियांचे दशक म्हणून जाहीर केले. त्याचा महाराष्ट्रातील स्त्री—चळवळीला भक्कम आधार मिळाला. महाराष्ट्रात स्त्री—चळवळ आकारास येऊ लागली. १९७५ मध्येच पुण्यात पहिली स्त्रीमुक्ती परिषद भरली. त्यामध्ये मध्यमवर्गीय स्त्रियांप्रमाणेच श्रमिक आणि ग्रामीण स्त्रियांचा मोठा सहभाग होता. १९७७ पासून निपाणी परिसरात तंबाखू उद्योगातील स्त्रियांची संघटना बांधण्याचे काम सुरू झाले. १९८१ मध्ये मुंबईच्या श्रीमती ना. दा. ठाकरसी महिला विद्यापीठात स्त्री—विषयक अभ्यासाची पहिली राष्ट्रीय परिषद भरली. १९८६ मध्ये चांदवड येथे शेतकरी संघटनेने स्त्रियांचा